नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०८/२०२५ (रविवार)**

---

## अवैधरित्या विनापरवाना विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद खापा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन खापा** :— दिनांक १६/०८/२०२५ रोजी खापा पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मध्यप्रदेश राज्यातुन महिंद्रा एक्स यु व्ही ७०० क्रमांक एम.एच ४९ सी क्यु ७७८६ या वाहनाने अवैधरीत्या दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी फॉरेस्ट नाका, खापा येथे नाकाबंदी केली असता एक पांढ—या रंगाची महिंद्रा एक्स यु व्ही ७०० क्रमांक एम.एच ४९ सी क्यु ७७८६ ही येताना दिसली . वाहन चालकास वाहन थांबविण्याचा ईशार केला असता चालकाने आपली गाडी पोलीसांना पाहुन वळवली आणि उमरी गावाकडे पळुन गेला. पोलीसांनी पाठलाग केला असता चालक हा वाहन उमरी गावाच्या नाल्याजवळ सोडुन झाडाझुडपाचा फायदा घेवुन पळुन गेला.वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता विदेशी दारू मिळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष १) रॉयल स्टॅग, सुपेरियर विस्की चे १६ पेटयामध्ये ७६८ निपा किंमती १,९९,६८० /— रूपये आणि २) महिंद्रा एक्स यु व्ही ७०० क्रमांक एम.एच ४९ सी क्यु ७७८६ किंमती १५,००,०००/— रूपये सा एकुण किंमती १६,९९,६८० /— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

महिंद्रा एक्स यु व्ही ७०० क्रमांक एम.एच ४९ सी क्यु ७७८६ चा चालक/मालक आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन खापा येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

**पोलीस स्टेशन कन्हान**:– पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत वार्ड क्रमांक ०२, येसंबा, कन्हान ता. मौदा, जि. नागपुर येथे दि. १६/०८/२०२५ रोजी संध्याकाळी १९:०० वाजेच्या सुमारास फिर्यादी सौ.रेवती सुरेश डडुरे, वय ६० वर्ष, रा. यसंबा,कन्हान ता.मौदा नागपुर यांचे दोन्ही मुले नामे १) ऋषी सुरेश डडुरे, वय २८ वर्ष २) छगन सुरेश डडुरे, वय २७ वर्ष हे त्यांचे घरी असलेल्या किराणा दुकानात हजर असतांना आरोपी नामे आशिष सेवकराम राउत, वय २८ वर्ष, रा. .यसंबा कन्हान, ता.मौदा नागपुर हा दुकानात आला व मला सामान उधारी का देत नाही, असे बोलुन त्याने ऋषी सुरेश डडुरे यास शिवीगाळी करुन गच्ची पकडली व खली पाडले तसेच छगन सुरेश डडुरे यास सुध्दा खाली पाडुन मारहाण केली आणि आरोपीने त्याच्या कमरेत ठेवलेल्या चाकूने ऋषी सुरेश डडुरे आणि छगन सुरेश डडुरे यांचेवर जीवे घेण्याचे उदेदशाने हल्ला करून जखमी केले. फिर्यादी त्यांच्या मुलांना वाचविण्यासाठी गेल्या


असता त्यांच्या  बोटावर चाकुने जखम झाली. जखमींना उपचारा कामी दाखान्यात दाखल करण्यत आले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कन्हान  येथे आरोपीविरूद्ध कलम १०९(१), ३५२ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद केला असुन **आरोपीस पोलीसांनी अटक केली आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे स्वतंत्रदिनानिमित्य अमली पदार्थ विरोधी अभियानांतर्गत करण्यात आली जनजागृती

**स्वतंत्रदिनानिमित्याने अमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियाना अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात खालील प्रमाणे अंमली पदार्थ सेवनाच्या हानीकारक परिणामांबद्दल जगजागृती करून विशेष कार्यक्रम राबविण्यात आले आहे.**

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :—** **दिनांक १७/०८/२०२५ रोजी** पोलीस स्टेशन एमआयडीसी  बोरी हद्दीतील कॅलरीज इंडीया प्रायव्हेट कंपनी येथे श्री. दिपक अग्रवाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उपविभाग नागपुर यांचे उपस्थितीत अंमली पदार्थ विरोधी अभियाना अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमात श्री. दिपक अग्रवाल आणि सपोनि श्री प्रशांत भोयर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन एमआयडीसी  बोरी  यांनी कंपनीतील अधिकारी तसेच कामगारांना व्यसनाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे परिणाम,यावर मार्गदर्शन करून जनजागृती केली. **उपस्थितीतांनी अंमली पदार्थ मुक्त भारत निर्माण करण्याची प्रतिज्ञा घेतली.**


नशा विरोधी

**पोलीस स्टेशन उमरेड :— दिनांक १६/०८/२०२५ रोजी** पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड यांनी उमरेड येथील श्रीकृष्ण मंदीर येथे उपस्थित नागरिकांना व्यसनाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे परिणाम,यावर मार्गदर्शन करून अंमली पदार्थ विरोधी अभियानाअंतर्गत जनजागृती केली.




**पोलीस स्टेशन कुही :— दिनांक १६/०८/२०२५ रोजी** कुही पोलीसांनी मांढळ येथील मस्जिद येथे उपस्थित मुस्लीम बांधवाना व्यसनाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे परिणाम,यावर मार्गदर्शन करून अंमली पदार्थ विरोधी अभियानाअंतर्गत जनजागृती केली.



## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने ,अवैध दारू वर कारवाई

दिनांक १६/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १७/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. रामटेक उपविभागात पारशिवणी पोस्टे अंतर्गत माहुली, अरोली पोलीस स्टेशन अंतर्गत कोदामेंढी येथे आणि रामटेक येथे पायदळ पेट्रोलींग करून

कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि सदर कोबिंग ऑपरेशन श्री रमेश बरकते यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. हॉटेल लॉजेस चेक करण्यात आले. नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार यांच्या सोबत दंगा नियंत्रण पथक चे अंमलदार हजर होते. रात्रगस्त आणि कोबिंग दरम्यान अवैध दारू बाबत ५ कारवाई, एन.डी.पी.एस कायदयान्वये २ कारवाई केल्या असुन मोटर वाहन अधिनियम अन्वये २१ कारवाई करण्यात आल्या आहेत.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने